Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)


ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA




Volume - XI, Issue - I,
January - March - 2022
Marathi Part - I / II

Impact Factor / Indexing
2020 - 6.306
www.sjifactor.com



Ajanta
Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | म. गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा राष्ट्रवाद : एक तुलनात्मक अभ्यास<br>**उज्ज्वला प्रभाकरराव पांगरकर** | १-७ |
| २ | छत्रपती शिवाजी महाराजांची सैन्य व्यवस्था<br>**प्रा. भावसार जे. आर.** | ८-९ |
| ३ | औरंगाबाद जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता चाचण्यांची मानके ठरविणे<br>**श्री. मधुकर पांडुरंग वाकळे**<br>**डॉ. मकरंद श्रीकृष्ण जोशी** | १०-१५ |
| ४ | जागतिक राजकारणात भारताचे स्थान व भूमिका<br>**डॉ. प्रतिभा टावरी** | १६-२० |
| ५ | स्त्री शिक्षणाचा विकास व महत्त्व एक शैक्षणिक अभ्यास<br>**डॉ. रोहिदास नामदेव उद्मल्ले** | २१-२४ |
| ६ | कृषी उत्पादन खर्च संकल्पनांचा अभ्यास<br>**प्रा. डॉ. डी. के. मगर** | २५-३१ |

VOLUME - XI, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2022
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com)

# ६. कृषी उत्पादन खर्च संकल्पनांचा अभ्यास

**प्रा. डॉ. डी. के. मगर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर.

**प्रस्तावना**

कृषी आदान (Inport) आणि कृषी उत्पादनाच्या (Output) किंमतीविषयक धोरणांचा आढावा घेण्यासाठी कृषी आदानांचा सखोल अभ्यास, कृषी आदानांच्या किंमती, कृषी पिकांचा आढावा, किमान आधारभुत किंमती आणि शासनाचे खर्च व किंमती ठरविण्याचे धोरणे, आधारभुत किंमतीतील वाढीची प्रवृत्ती ही कृषी उत्पादनाच्या संकल्पनेवर आधारीत आहे. त्यामुळे देशातील कृषी उत्पादन खर्च काढण्याच्या पद्धतीवर कृषी किंमत धोरण अवलंबुन असते. देशातील कृषी उत्पादनाचा खर्च काढण्यासाठी सन 1958 मध्ये नवी दिल्ली येथे अन्न आणि कृषी संघटनेकडून आयोजित 'कृषी किंमत धोरण' विषयक चर्चा सत्रात प्रमाणित विविध पद्धती देण्यात आल्या होत्या. ह्या पद्धती सर्वसामान्यपणे कृषी पिकांचा खर्च काढण्यासाठी वापरण्यात येतात. त्यानंतर भारत सरकारने कृषी पिकांचा सर्वसमावेशी उत्पादन खर्च ठरविण्यासाठी सन 1967 मध्ये 'अशोक मित्रा' यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समितीची स्थापना केली. सन 1979 मध्ये 'एस.आर.सेन. ' यांच्या अध्यक्षतेखाली कृषी उत्पादन लागवड खर्च काढण्यासाठी समिती स्थापन केली होती. सन 1990 मध्ये भारतातील कृषी उत्पादन खर्च काढण्याच्या पद्धतीचे पुनरावलोकन करण्यासाठी 'हनुमंतराव समिती' स्थापन करण्यात आली होती. सन 2005 मध्ये भारतातील किमान आधारभूत किंमती निश्चितीसाठी उत्पादन खर्चाच्या पद्धतीचे मूल्यमापन करण्यासाठी 'वाय.के.अलघ' यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. त्यानुसार भारतातील कृषी उत्पादनाच्या किमान आधारभूत किंमती निश्चित करण्यासाठी व उत्पादन खर्च काढण्यासाठी पुढील खर्च संकल्पना आणि पद्धतीचा उपयोग केला जातो.

**कृषी उत्पादन खर्च योजनेची उद्दिष्टे**

या योजनेची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

1. प्रमुख पिकांच्या लागवडीकरीता वापरण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या निविष्ठांची व त्यापासून मिळणाऱ्या उत्पादन व खर्चाची शास्त्रोक्त, अचूक, वस्तुनिष्ठ व विश्वसनीय माहिती गोळा करणे.
2. प्रमुख पिकांच्या प्रति हेक्टर लागवड खर्च व प्रति क्विंटल उत्पादन खर्च काढणे.

**कृषी उत्पादन खर्च योजनेची उपयुक्तता**

परिव्यय लेख (Cost Accounting Method) पद्धतीने निवडलेल्या शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेटी देऊन प्रमुख पिकांची शास्त्रोक्त, अचूक व विश्वसनीय माहिती संकलित करणारी व त्यावर शास्त्रीय विश्लेषण करणारी एकमेव योजना राज्यात कार्यान्वीत आहे. या योजने अंतर्गत गोळा केलेल्या माहितीच्या आधारावर शेतमालाच्या आधारभूत किंमती

ठरविण्यासाठी आकडेवारी राज्य शासनास सादर केली जाते. पीक कर्ज धोरण ठरविणे, पीक विमा योजनेस, कृषी आयुक्तालय, शासकीय संस्था, अशासकीय संस्था, पोलीस विभाग व संशोधनास देखील या योजनेद्वारे गोळा केलेली माहिती पुरविली जाते.

**कृषी उत्पादन खर्च काढण्याच्या पद्धती**

देशातील कृषी उत्पादनाचा खर्च काढण्यासाठी सन 1958 मध्ये नवी दिल्ली येथे अन्न आणि कृषी संघटनेकडून आयोजित 'कृषी किंमत धोरण' विषयक चर्चा सत्रात प्रमाणित विविध पद्धती देण्यात आल्या होत्या. ह्या पद्धती सर्वसामान्यपणे कृषी पिकांचा खर्च काढण्यासाठी वापरण्यात येतात. त्यानंतर भारत सरकारने कृषी पिकांचा सर्वसमावेशी उत्पादन खर्च ठरविण्यासाठी सन 1967 मध्ये 'अशोक मित्रा' यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समितीची स्थापना केली. सन 1979 मध्ये 'एस.आर.सेन. ' यांच्या अध्यक्षतेखाली कृषी उत्पादन लागवड खर्च काढण्यासाठी समिती स्थापन केली होती. सन 1990 मध्ये भारतातील कृषी उत्पादन खर्च काढण्याच्या पद्धतीचे पुनरावलोकन करण्यासाठी 'हनुमंतराव समिती' स्थापन करण्यात आली होती. सन 2005 मध्ये भारतातील किमान आधारभूत किंमती निश्चितीसाठी उत्पादन खर्चाच्या पद्धतीचे मूल्यमापन करण्यासाठी 'वाय.के.अलघ' यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. त्यानुसार भारतातील कृषी उत्पादनाच्या किमान आधारभूत किंमती निश्चित करण्यासाठी व उत्पादन खर्च काढण्यासाठी पुढील खर्च संकल्पना आणि पद्धतीचा उपयोग केला जातो.

**पिक लागवड खर्च पद्धती**

कृषी पिकांचा उत्पादन खर्च काढतांना प्रती हेक्टर मध्ये पिकांचा प्रति क्विंटल उत्पादन खर्च निश्चित केला जातो.

**1. प्रत्यक्ष खर्च**

i. प्रत्यक्षनियुक्त केलेले श्रमिक (मानवी श्रम, जनावरांचे श्रम, यंत्राचे श्रम).

ii. स्वमालकीचे असलेले जनावरे व यंत्राचा देखभाल खर्च.

iii. आदानावरील खर्च यामध्ये बी-बियाणे (घरगुती आणि खरेदी केलेले), रासायनिक आणि सेंद्रिय खते (स्वमालकीचे आणि खरेदी केलेले), किटकनाशके आणि सिंचन

iv. शेती ईमारत आणि साधनांचा घसारा (जनावराचे शेड, यंत्रसामुग्रीचे शेड, धान्य शेड)

v. शेतसारा

vi. स्वत: भाडे तत्त्वावर घेतलेल्या जमिनीचा खंड.

**2. अप्रत्यक्ष खर्च**

i. कौटुंबिक श्रमाचे मूल्य.

ii. कौटुंबिक मालकीचे व्यवस्थापकीय आदान.

iii. स्वमालकीच्या जमिनीचा खंड.

iv. स्वमालकीच्या स्थिर भांडवलावरिल व्याज.[19]

पिक उत्पादन खर्च काढण्याच्या प्रमाणित संकल्पना

**तक्ता क्र. 1**

**पिक उत्पादन खर्च काढण्याच्या प्रमाणित संकल्पना**

| अ.क्र. | खर्च | खर्चाचा तपशिल |
|---|---|---|
| 1. | खर्च 'अ$_1$' | उत्पादनाकरिता शेतकऱ्यांद्वारे केला जाणारा सर्व प्रकारचा पैशाच्या स्वरूपातील खर्च. |
| 2. | खर्च 'अ$_2$' | खर्च 'अ$_1$'+ भाडे तत्त्वावर घेतलेल्या जमिनीचा खंड. |
| 3. | खर्च 'ब$_1$' | खर्च 'अ$_1$'+ स्वत:च्या भांडवली मालमतेवरिल व्याज (जमिनीव्यतिरिक्त) |
| 4. | खर्च 'ब$_2$' | खर्च 'ब$_1$'+ स्व:मालकीच्या जमिनीचा खंड आणि भाडे तत्त्वावर घेतलेल्या जमिनीचा खंड |
| 5. | खर्च 'क$_1$' | खर्च 'ब$_1$'+ कौटुंबिक श्रमाचे मूल्य. |
| 6. | खर्च 'क$_2$' | खर्च 'ब$_2$'+ कौटुंबिक श्रमाचे मूल्य. |

**स्रोत:-** Sen S.R. Committee Report on Cost of Cultivation .

**तक्ता क्र. 2**

**खर्च 'अ$_1$' उत्पादन खर्चाचे विश्लेषण**

| अ.क्र. | खर्च तपशिल | खर्च घटकांचा समावेश |
|---|---|---|
| 1. | खर्च 'अ$_1$' | 1. भाडे तत्त्वावरील मानवी श्रमाचे मूल्य. |
| | | 2. रोजंदारीवरिल बैलांच्या श्रमाचे मूल्य. |
| | | 3. स्वत:च्या मालकीच्या बैलाच्या श्रमाचे मूल्य. |
| | | 4. स्व:मालकीच्या यंत्राचे मूल्य. |
| | | 5. भाडे तत्त्वावरील घेतलेल्या यंत्राचे मूल्य. |
| | | 6. बी-बियाणांचे मूल्य (घरगुती व खरेदीचे) |
| | | 7. किटकनाशके आणि बुरशीनाशकांचे मूल्य. |
| | | 8. सेंद्रिय खतांचे मूल्य (घरगुती व खरेदीचे) |
| | | 9. रासायनिक खंताचे मूल्य. |
| | | 10. शेत ईमारत व साधनांचा घसारा. |
| | | 11. जलसिंचनावरिल खर्च. |
| | | 12. कालवा सिंचनावरील खर्च. |
| | | 13. शेतसारा व शेतीवरिल इतर खर्च. |
| | | 14. शेती अवजारांचा घसारा. |
| | | 15. खेळत्या भांडलावरील व्याज. |
| | | 16. इतर अनुषंगिक खर्च. |

**स्रोत:-** Report of Y.K. Alagh Committee to Examine Methodological Issues in Fixing MSP.

**प्रमाणित खर्चाच्या घटकांचे विश्लेषण**

**1. खेळत्या भांडवलावरिल व्याज**

खेळत्या भांडवलामध्ये श्रमिक खर्च, बैलांचा खर्च, यंत्राचा खर्च, बी-बियाणावरिल खर्च, सेंद्रिय व रासायनिक खतावरिल खर्च, सिंचन खर्च, पिक संरक्षण खर्च आणि इतर अनुषंगिक खर्च व प्रत्यक्षपणे बदलत्या घटकावर होणाऱ्या खर्चाचा समावेश खेळत्या भांडवली खर्चात होतो. खेळत्या भांडवलावरील व्याज काढतांना व्याजदर हा 12.5 टक्के ग्रहित धरला जातो आणि व्याजदर काढीत असतांना पिकाची लागवड ते काढणी कालावधी यातील निम्मा कालावधी विचारात घेतला जातो.

**2. स्थिर भांडवलावरिल व्याज**

स्थिर भांडवलामध्ये जमिनीचे मूल्य, उपलब्ध सिंचनाचे संसाधन, शेतीमधील जनावरांचे शेड, अन्नधान्य साठा शेड व उपलब्ध कायमस्वरूपी संसाधने यांचा समावेश स्थिर भांडवलात केला जातो. स्थिर भांडवलावरिल व्याज हे वार्षिक 10 टक्के व्याजदराने काढले जाते.

**3. जमिनीचा खंड**

जमिनीचा खंड निश्चित करतांना प्रथम प्रती हेक्टरी मुख्य व दुय्यम उत्पादनाची प्रचलित दराने किंमत काढण्यात येते. त्याच्या 1/6 भाग रक्कम जमिनीचा खंड म्हणून ग्रहित धरण्यात येते.

**4. व्यवस्थापकिय खर्च**

सर्व प्रथम 'हनुमंतराव समितीने' व्यवस्थापकीय खर्चात शेतकऱ्यांनी केलेल्या व्यवस्थापकीय कौशल्य, त्याच्या श्रमाचे योगदान आणि पिक उत्पादनासाठी शेतकऱ्यांचे व्यवस्थापन हे सर्व व्यवस्थापकीय खर्चात ग्रहित धरण्यात यावे व एकूण खर्चाच्या 10 टक्के खर्च हा व्यवस्थापन खर्च ग्रहित धरावा असे सुचविले परंतु हा खर्च उत्पादन खर्चात ग्रहित धरला जात नाही.

**तक्ता क्र. 3**

**उत्पादन खर्च घटकांचा तपशिल**

| अ.क्र. | तपशिल | तपशिलाचे निकष |
|---|---|---|
| 1. | कौटुंबिक श्रमिक | कौटुंबिक श्रमाचे मूल्य हे कायदेशिर वेतनदर किंवा प्रचलित बाजार दर यामधील जे जास्त आहे ते ग्रहित धरण्यात येते. |
| 2. | स्व:मालकीच्या बैलांचे श्रम | स्व:मालकीच्या बैलांच्या श्रमाच्या मूल्यांचा समावेश हा जनावर आणि जनावरांचे शेड यांच्यावर होणाऱ्या घसारा खर्चाचा समावेश असतो. |
| 3. | स्व:मालकीच्या यंत्रावरील खर्च | ह्या खर्चाचा समावेश शेतीमधील यंत्राच्या डिझेल, विद्युत, वंगण, घसारा दुरूस्ती आणि देखभाल खर्चात समावेश असतो. |
| 4. | अनुषंगिक खर्च | उपकरणाचा किरकोळ, दुरूस्ती व इतर बाबीवर होणारा खर्च. |
| 5. | सेंद्रिय खत | गावातील प्रचलित असलेल्या दरानुसार खर्च. |
| 6. | स्व:मालकीच्या जमिनीचा खंड | गावातील प्रचलित असलेला जमिनीचा खंड किंवा कायदेशीर राज्याने ठरवून दिलेला खंड यांचा समावेश होतो. |

| | | |
|---|---|---|
| 7. | स्थिर भांडलावरील व्याज | स्थिर भांडलावरील व्याज हे वार्षिक 10 टक्के असते. |
| 8. | खेळत्या भांडवरिल व्याज | पिकांचा अर्धा कालावधी ग्रहित धरून 12.5 टक्के दराने खेळत्या भांडलावरिल व्याज काढले जाते. |
| 9. | देयकाचे प्रकार | गावातील प्रचलित पद्धतीनुसार देयके अदा केली जातात. |
| 10. | मुख्य आणि दुय्यम उत्पादन | पिक काढणीनंतर उत्पादनाला मिळणारी किंमत. |
| 11. | स्व:मालकोची आणि लागवडीखालील जमीन | लागवडी खालील असलेल्या जमिनीच्या मातीचा प्रकार, सिंचनाची उपलब्धता, गावापासून जमिनीचे अंतर इत्यादीद्वारे जमिनीचे मूल्य ठरते किंवा गावातील प्रचलित किंमतीनुसार जमिनीचे मूल्य ग्रहित धरले जाते. |
| 12. | शेती ईमारत (जनावरांचे शेड, साठा शेड इत्यादी) | गावातील प्रचलित किंमतीनुसार मूल्य ग्रहित धरले जाते. |
| 13. | शेती साधने आणि यंत्राचा उपयोग | बाजार भावानुसार मूल्य काढले जाते. |
| 14. | पशुधन | बाजारभावानुसार मूल्य काढले जाते. |

**स्रोतः-** Report of Y.K. Alagh Committee to Examine Methodological Issues in Fixing MSP,

**महाराष्ट्रातील कृषी उत्पादन खर्च आणि किंमती**

केंद्रीय शेतमाल खर्च व किंमत आयोग विविध पिकांच्या आधारभूत किंमती ठरविण्यासाठी केंद्र शासनास शिफारस करत असते. त्या शिफारशी विचारात घेऊन केंद्र शासन विविध पिकांच्या आधारभूत किंमती प्रत्येक हंगामाच्या सुरूवातीस घोषीत करत असते. शेतमालाच्या उत्पादन खर्चाची आकडेवारी काढण्यासाठी आयोगाने बहुव्यापक योजना कार्यान्वित केली असून त्या योजने अंतर्गत सर्व राज्यामधून उत्पादन खर्चाची माहिती गोळा करण्यात येते. तसेच सर्व राज्य शासनास केंद्रीय आयोगाकडून प्रत्येक हंगामात एक प्रश्नावली पाठवली जाते. सदर प्रश्नावलीमध्ये विविध पिकांविषयी माहिती तसेच इतर पायाभूत माहिती व राज्य शासनाने अभ्यासलेल्या विविध पिकांच्या उत्पादन खर्चावर आधारित ठरलेल्या किंमतीची माहिती मागवण्यात येते. या माहितीवर आधारीत व राज्य शासनाची मते जाणून घेतल्यानंतर केंद्रीय शेतमाल खर्च व किंमत आयोग विविध पिकांच्या आधारभूत किंमती केंद्र शासनास शिफारस करते.

सन 1979 पूर्वी केंद्र शासनाच्या बहुव्यापक योजने अंतर्गत निवडलेल्या पिकांच्या माहितीचा आयोग करून राज्य शेतमाल भाव समिती केंद्रीय शेतमाल खर्च व किंमत आयोगास आधारभूत किंमतीची शिफारस करीत असे. महाराष्ट्र राज्यात सदर योजना फक्त महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत राबविण्यात येत होती. परंतु सदर योजनेत ठराविक पिकांवर सर्वेक्षण घेण्यात येत असल्यामुळे व उपलब्ध माहितीचे पृथ:करण करून निष्कर्ष उपलब्ध होण्यास उशीर होत असे तसेच माहिती गोळा करण्याकरिता निवडलेला नमुना (Sample size) अत्यंत लहान असल्यामुळे शिफारशी करण्याकरिता राज्य शासनाने राज्यातील कृषी हवामाननिहाय वेगवेगळ्या पिकांची अचूक व पुरेशा नमुन्याची (Sufficient sample) माहिती मिळण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्यातील प्रमुख पिकांच्या कायमस्वरूपी यंत्रणा निर्माण करण्याची योजना महाराष्ट्र शासन कृषी व सहकार

विभाग निर्णय क्र. अेपीसी/1075/36036/11 अे. मंत्रालय विस्तार मुंबई-32 दि.5 मार्च 1979 अन्वये कार्यान्वित केली. या योजनेमध्ये लेखा परिव्यय (Cost accounting method) पद्धतीने माहिती गोळा केली जाते. नमुन्याची पुरेशी संख्या, कृषी हवामान विभागनिहाय नियोजन व राज्यातील बहुतांश प्रमुख पिकांवर आधारित अचूक व विश्वासार्ह निष्कर्ष मिळाल्यामुळे राज्य शेतमाल भाव समितीस केंद्रीय शेतमाल खर्च व किंमत आयोगास शिफारस करण्यास सहाय्यभूत आहे.

यासाठी कृषी आयुक्त, संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, तसेच शेतमाल भाव समिती कक्ष व राज्यातील चारही कृषी विद्यापीठे यांच्या संयुक्त सहकार्याने राज्यातील प्रमुख पिकांची शास्त्रीय पद्धतीने (निविष्ठा व उत्पादना बाबत) अचूक व विश्वासार्ह माहिती गोळा करण्यात येते व त्यावर आधारित शिफारशी करण्यात येतात.

**कृषी उत्पादन खर्च योजनेची कार्यपद्धती**

1. या योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्यात दर तीन वर्षाच्या कालावधीसाठी पीकनिहाय एकूण 279 गाव समुहात आखणी केली जाते.
2. गावसमुह निवड प्रक्रिया मुख्य सांख्यिकी, कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या मार्गदर्शनानुसार पार पाडली जाते.
3. प्रत्येक पिकाकरीता कृषी हवामान विभागानुसार, तालुका, गावसमुह आणि शेतकरी अशा त्रिस्तरीय नमुना निवड पद्धतीने (मल्टी स्टेज रॅण्डम सँपलींग टेक्नीक) निवड करण्यात येते.
4. निवडलेल्या गावसमुहातून जमीन धारण क्षेत्रानुसार शेतकऱ्यांची निवड योजनेत माहिती घेण्यासाठी केली जाते. निवडलेल्या शेतकऱ्यांची संपूर्ण माहिती परिव्यय लेखा पद्धतीने 1 ते 17 तक्त्यात गोळा केली जाते.
5. माहितीचे अर्थशास्त्राच्या सरासरी पद्धतीने विश्लेषण करून पीकनिहाय प्रति हेक्टर व प्रति क्विंटल उत्पादन व खर्चाची आकडेवारी शेतमाल भाव समिती कक्ष, मुंबई मार्फत महाराष्ट्र शासनास सादर केली जाते.
6. महाराष्ट्र शासन ही माहिती विविध पिकांच्या किमान आधारभूत किंमत ठरविण्यासाठी केंद्रीय कृषी खर्च व किंमती आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविते.

**पिक लागवड खर्च योजनेची व्याप्ती**

महाराष्ट्र राज्यातील प्रमुख पिकांच्या लागवड खर्चाचा अभ्यास करण्याची कायमस्वरूपी यंत्रणा तथा पीक लागवड खर्च काढण्याच्या योजनेची व्याप्ती संपूर्ण राज्यभर आहे.

सन 1980 मध्ये एकूण 7 पिकांचा उत्पादन खर्च काढण्यासाठी राज्यातील चारही कृषी विद्यापीठामार्फत या योजनेस सुरूवात झाली.

आजमितीस एकूण 39 पिकांच्या उत्पादन खर्चाचा अभ्यास केला जातो. राज्यशासन, कृषी खात्याचा सांख्यिकी विभाग व कृषी विद्यापीठाचा सहभाग या योजनेत आहे. दर तीन वर्षांनी राज्य शासनाच्या संमतीने योजनेचा तांत्रिक कार्यकाल बदलतो.

**सारांश**

कृषी उत्पादन खर्च संकल्पनेचा अभ्यास म्हणजे शेतकऱ्यांना कृषी खर्च लाभ प्रमाणा विषयी मार्गदर्शन करणारा आहे. कृषी उत्पादन खर्च संकल्पनेचा अभ्यास म्हणजे शेतकऱ्यांना कृषी खर्च लाभ प्रमाणा विषयी मार्गदर्शन करणारा आहे. भारतातील व राज्यातील कृषी आदानाच्या किंमती निश्चित करुन उत्पादन खर्च या खर्च संकल्पनेवर केंद्र व राज्य सरकार भारतातील व राज्यातील कृषी आदानाच्या किंमती निश्चित करुन उत्पादन खर्च निश्चित केला जातो त्यावरुन किमान आधारभुत किमतींविषयक धोरणे ठरविली जातात व त्याची अंमलजबावणी केली जाते त्या करीता शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनाला कोणत्या आधारावर किंमत मिळते या विषयी खर्च संकल्पना मार्गदर्शन करतात हे सारांश रुपाने सांगता येते.

**संदर्भ**

1. कविमंडन विजय (2002), कृषी अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर.
2. मराठवाडा कृषी विद्यापीठ (2013); कृषी दैनंदिनी, विस्तार शिक्षण संचालनालय, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी.
3. Government of India (1985); Reports on Agriculture Cost and Price, Ministry of Agriculture and Farmers Welfare, New Delhi.
4. Sen S. R. (1979); Committee Report on Cost of Cultivation, Ministry of Agriculture Govt. of India, New Delhi.
5. Alagh Y. K. (2005); Report of the Expert Committee to Examine Methodological Issues in Fixing MSP, Ministry of Agriculture, Govt. of India.
6. महाराष्ट्र शासन (2013); महाराष्ट्र राज्य शेतमाल भाव समिती अहवाल, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
7. कातकडे जे. एल. (2013); पीक लागवड खर्चाविषयी संक्षिप्त टिप्पणी, कृषी अर्थशास्त्र व संख्याशास्त्र विभाग, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी.

Asstt. Prof.
Hut.Jaywantrao Patil Mahavidyalaya
Himayatnagar Tq. Himayatnagar Dist. Nanded